## जनावरांमध्ये लम्पी आजाराचा धोका वाढतोय, शेतकऱ्यांनो काय घ्याल काळजी?

पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात मच्छर, गोमाशा, गोचीड तसेच कीटकांपासून जनावरांना विषानुजान्य (व्हायरल) रोगांची लागण होते.गेल्या काही महिन्यांपूर्वी सहा राज्यांमध्ये लम्पी त्वचा रोगाचा प्रादुर्भाव होऊन जनावरे मृत्यूमुखी पडलीत. लम्पी त्वचा रोग हा गोवंश व म्हैसवर्गातील जनावरांना होणारा विषाणूजन्य त्वचा रोग आहे. हा आजार जनावरांपासून मानवासंक्रमित होत नाही. 'लम्पीस्कीन' हा पशुधनातील वेगाने पसरणारा संसर्गजन्य आजार आहे. याआजाराने पशुधन दगावण्याचे प्रमाण अत्यल्प आहे. पण शेतकऱ्यांनी काळजी घेत सतर्क राहण्याची आवश्यकता आहे असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा येथील डॉ. सचिन मुळे विषय विशेषज्ञ, पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र व डॉ. जीवन कतोरे, वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख यांच्या द्वारे करण्यात येत आहे. तसेच आपल्या जनावरांची वेळीच काळजी घेतल्यास आपल्या जनावाराला लम्पी आजाराची लागण होण्यापासून वाचविता येईल.

**या आजाराचा रोगप्रसार कसा होतो?**

- मच्छर, गोमाशा, गोचीड, चावणार्या माशा, बाधित जनावरांचा स्पर्श, दुषित चार व पाणी.

**हा आजार होण्यामागील कारण?**

या आजारासाठी कारणीभूत असणारे हवषाण, देवी हवषाणू गटातील कॅ प्रीपॉक्स (Capripox) या प्रवगात मोडतात.

**या आजाराची प्रमुख लक्षणे कोणती?**

आजाराचा संसर्ग झाल्यास प्रथम जनावरांच्या डोळयातून व नाकातून पाणी येते, सुरवातीस ताप येतो, दुधाचे प्रमाण कमी होते, चाराखाणे, पाणी पिणे कमी होते, हळूहळू डोके, मान, मायांग, कास. भागाच्या त्वचेवर 10-50 मिमी व्यासाच्या गाठीप्रामुख्याने येतात, तोंडातील व्रणामुळे आजारी जनावरांना चारा खाण्यास त्रास होतो, डोळ्यातीलव्रणामुळे चिपडे येतात, डोळ्यांची दृष्टीबाधित होते, पायावरसूजयेवूनकाहीजनावरेलंगडतात.

**पशु पालकांनी घ्यावयाची काळजी**

लम्पीत्वचारोग हा संसर्गजन्यरोग असल्याने उपचार करण्यापेक्षा रोग येऊच नये याकरिता प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात. रोग आल्यास त्याचा प्रसार होऊ नये. याकरिता शेतकऱ्यांनी आवश्यक ती काळजी घेण्याची आवश्यकता आहे. बाह्यकिटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गोठ्यांची व्यवस्थित स्वच्छता राखावी. निरोगी जनावरांना बाधित जनावरांपासून वेगळेबांधावे. गायी व म्हशींना एकत्रित ठेवण्यात येवू नये. जनावरामध्ये हा आजार अत्यंत संसर्गजन्य असल्यामुळे रोग सदृश लक्षणे आढळल्यास जवळच्या पशुवैद्यकीय संस्था प्रमुखांना तातडीने संपर्क साधावा. बाधित गावांमध्ये बाधित जनावरांच्या पिण्याच्या पाण्याकरिता व तसेच चराई करिता स्वतंत्र व्यवस्था करावी. साथीच्या काळात बाधितभागातील जनावरे व मानवाचा निरोगी भागात प्रवेश टाळावा. बाधित परिसरात स्वच्छता करावी व निर्जंतुकद्रावणाची परिसरात फवारणी करावी. संध्याकाळी जनावरांच्या गोठ्यात धूर करावा. दरम्यान, यारोगाने ग्रस्त जनावरांचा मृत्यू झाल्यास मृतदेहाची शास्त्रीय पद्धतीने कमीतकमी 8फूट खोलखड्डयात गाडून विल्हेवाट लावावी असे आवाहन कृषी विज्ञान केंद्र सेलसुराद्वारे करण्यात येत आहे.





**वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख**
**कृषि विज्ञान केंद्र, सेलसुरा**